# प्रकरण तीन

## एकात्मिक बालविकास विभाग

**3.920 अंगणवाडी केंद्रातील बालकांना गणवेश पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत एकात्मिक बालविकास विभागाचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षामध्ये आयुक्त, एकात्मिक बालविकास विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेश क्रमांक एबाविसेयो/का-7/2296/ 2015-2016, दिनांक 13/08/2015 अन्वये अंगणवाडी सेविका / अंगणवाडी मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांना गणवेश / साडी अनुदान व मार्गदर्शक तत्वे तसेच आदेश क्रमांक एबाविसेयो/ का-7/2293/15-16, दिनांक 13/08/2015 अन्वये परिवर्तनिय निधी (Flexi Fund) व मार्गदर्शक तत्वे मंजूर केलेली आहेत.

आयुक्त, एकात्मिक बालविकास विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेश क्रमांक एबावि सेयो/का-7/ 2895/2015-16, दिनांक 29/10/2015 अन्वये साडी खरेदी व परिवर्तनिय निधीसाठी खालीलप्रमाणे कोषागारातून रोखीने देय आदेश प्राप्त झालेले आहेत. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, ठाणे यांचे क्रमांक ठाजिप/मबाकवि/लेखा/337/2015-2016, दिनांक 09/11/2015 अन्वये परिवर्तनीय निधी वितरीत करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच जावक क्रमांक ठाजिप/मबाकवि/लेखा/ गणवेश/ 338/2015-2016, दिनांक 09/11/2015 अन्वये अंगणवाडी मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका गणवेश खरेदीचे निधी वितरण आदेश देण्यात आलेले आहेत. सदरची योजना ही 90 टक्के अनुदान केंद्र शासन व 10 टक्के अनुदान राज्य शासन हिस्सा आहे.

1) उपरोक्त लेखाशिर्ष 2236-0072 व 1373 खालील मंजूरीप्रमाणे रक्कमा कोषागारातून आहरीत करण्यात आलेल्या आहेत. तथापि, लेखाशिर्ष 2236-1372 खाली 31-सहायक अनुदानासाठी अर्थसंकल्पीय प्रणालीवर (BDS) रुपये 46,612/- जादा रक्कम टाकलेली असल्याचे दिसून येते. सदर रक्कमेचे कोणत्याही प्रकारचे आदेश महिला व बालविकास विभागाला नसल्याने सदरची जादा रक्कम शासनास समर्पित करणे बाकी आहे. तरी सदरची रक्कम त्वरीत शासन खाती भरणा करावी.

2) सदर योजनेचा फलश्रुती अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र उपमुख्य कार्यकारी अधिकारी, बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, ठाणे यांचेकडे न चुकता सादर करावा, असे असतांना उपयोगिता प्रमाणपत्र व फलश्रुती अहवाल संचिकेत दिसून आले नाही.

3) परिवर्तनीय अनुदान हे अंगणवाडी / मिनी अंगणवाडी सेविकेकडून सदर तरतुद मान्य बाबीवर खर्च करावयाची आहे. सदर रकमेच्या खर्चाचा हिशोब अंगणवाडी स्तरावरच ठेवायचा असून सदर खर्चाचा आढावा मुख्य सेविकेने त्यांचे अंगणवाडी भेटीत वेळोवेळी घ्यावयाचा आहे. सदर रक्कम खालील बाबींसाठी उपयोगात आणण्यात यावेत.

(अ) गरोदर महिला यांना अचानक दवाखान्यात पोहचविणे आवश्यक असल्यास त्यासाठीचा प्रवास खर्च उदा. बस अथवा रिक्षा भाडे.

(ब) अंगणवाडीतील कुपोषित अथवा आजारी बालकाला संदर्भ सेवेअंतर्गत दवाखान्यात पाठवावयाचे आहे, परंतु, पालक प्रवास खर्च करण्यासाठी सक्षम नसतील अशा प्रकरणी यातून खर्च भागविता येऊ शकेल.

(क) स्थानिक नाविन्यपूर्ण कार्यक्रम सामुदायिक संपर्क कार्यक्रम, अत्यावश्यक सेवा पुरविण्यासाठी हा निधी उपयोगात आणता येऊ शकेल.

(4) अंगणवाडी केंद्रात नादुरुस्त परंतू, दुरुस्ती होण्यायोग्य असलेल्या वजन काटयाच्या दुरुस्ती साठीचा किरकोळ खर्च यातून भागविता येऊ शकेल.

सदरचा खर्च हा योग्य झालेबाबतचा मुख्य सेविकेमार्फत गटविकास अधिकारी पंचायत समितींना कळविणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर खर्च हा त्याच प्रयोजनावर झाल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**3.921 विशेष घटक योजना अंतर्गत महिलांना घरघंटी पुरविणे.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत एकात्मिक बालविकास विभागाचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात प्रमाणक क्रमांक 737, दिनांक 31/03/2016 अन्वये रुपये 5,42,300/-, 10 टक्के हिस्यासह खर्च केला आहे.

1) महाराष्ट्र शासन, उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 02/01/1992, परिशिष्ट 7 मध्ये नमुद केल्याप्रमाणे खरेदी समितीच्या इतिवृत्तात बाजारातील दुकानदारांचे बाजार भावाचे तीन दर नमुद केलेले आहेत. अनुक्रमे (1) मे.दिनेश एन्टरप्रायजेस, कल्याण - रुपये 22,500/- प्रती नग, (2) मे.युनिव्हर्स ट्रेडींग कंपनी - रुपये 20,496/- प्रती नग, (3) मे.मुरबाडकर बिझनेस इंडस्ट्रीज, कल्याण - रुपये 20,300/- प्रती नग, सदरचे दर बाजारभावाप्रमाणे असल्याबाबत स्पष्ट होत नाही.

2) सन 2015-2016 मध्ये खरेदी समितीच्या मान्यतेने पुरवठा आदेश क्रमांक ठाजिप/एबाविसेयो/योजना/335, दिनांक 19/03/2016 अन्वये 29 नग घरघंटीसाठी रुपये 18,700/- (वाटाघाटी नंतर) प्रती नग पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. याप्रमाणे दर देतांना खरेदी समितीची बैठकीचे इतिवृत्त संचिकेत आहे.

3) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-1088/(2512)/उदयोग-6, दिनांक 02/01/1992, अनुक्रमांक 8.2, परिशिष्ट 6 मध्ये नमूद केल्याप्रमाणे लॅटीन आयोगाच्या शिफारशीनुसार खरेदी समितीत सर्व सभासदांनी बैठकीपुर्वी प्रतिज्ञापत्र दयावयाचे आहे. सदर खरेदी संचिकेची तपासणी केली असता, सदर प्रतिज्ञापत्र संचिकेत संलग्न नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/, दिनांक 20/06/2008 मधील परिशिष्ट-ई मध्ये नमुद केलेल्या वेळापत्रकानुसार सदर योजनेची अंमलबजावणी झाल्याचे दिसून येत नाही. साहित्य पुरवठा कोणत्या तारखेला पोहच केला? याबाबत खुलासा होत नाही. सदरचे साहित्य हे विहीत मुदतीत पुरवठा केला नसेल तर पुरवठा आदेशातील अटी व शर्ती मधील अट क्रमांक 3 ला अधिन राहून कार्यवाही करावी. पुरवठा आदेशात अंबरनाथ - 08, व भिवंडी - 21 अशा एकूण 29 घरघंटी पुरविण्याचे आदेश पारीत केले आहेत. संचिकेत लाभार्थ्यींना साहित्य वाटप केल्याचे दिसून येत नाही. सदर साहित्य वाटप झाल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र दिसून येत नाही.

5) योजना राबविण्यात येत असतांना भिवंडी - 1 प्रस्तावामधील लाभार्थी अनुक्रमांक (1) श्रीमती संगिता भगवान चन्ने यांचे वीज बील, दारिद्र रेषेखालील दाखला प्रस्तावासोबत जोडल्याचे दिसून येत नसल्याने खात्री करता येत नाही.

**3.922 आदिवासी उपयोजना अंगणवाडी इमारत बांधकामाबाबत.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रूपये 12,97,56,000/- खर्च केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अ) विभागाने उपलब्ध करून दिलेल्या तपशिला नुसार सन 2013-2014 मध्ये 207 मंजूर कामांपैकी 143 कामे पूर्ण झाली असून अपूर्ण 64 कामासाठी रूपये 83.28 लक्ष इतके दायित्व आहेत. अपूर्ण कामे वेळीच पूर्ण झाली नाही, तर खर्च वाया जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याची संपूर्ण जबाबदारी विभागाची राहील.

ब) विभागाने उपलब्ध करून दिलेल्या तपशिलानुसार सन 2014-2015 मध्ये 126 मंजूर कामांपैकी 5 कामे पूर्ण झाली असून अपूर्ण 121 कामासाठी रूपये 159.72/- लक्ष इतके दायित्व आहेत. अपूर्ण कामे वेळीच पूर्ण झाली नाही, तर खर्च वाया जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याची संपूर्ण जबाबदारी विभागाची राहील.

क) विभागाने उपलब्ध करून दिलेल्या तपशिला नुसार सन 2015-2016 मध्ये 242 मंजूर कामांपैकी एकही काम पूर्ण झाले नसून 242 कामासाठी 80 टक्के रूपये 1,277.76/- लाख निधी प्राप्त झाला आहे व उर्वरित रूपये 319.44/- लक्ष इतकी रक्कम शिल्लक असून दायित्व आहेत. आदिवासी उपयोजनेच्या अटी व शर्तीनुसार मार्च 2017अखेर निधी खर्च होणे आवश्यक होते. अपूर्ण कामे वेळीच पूर्ण झाली नाही, तर खर्च वाया जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

2) अंगणवाडी इमारतींना गटस्तरावर वित्तीय प्रेषणाने अनुदान वितरीत करतांना प्रशासकीय मान्यतेच्या आदेशामध्ये गौण खनिज कपातीबाबत आणि महसूल खात्यात भरणा करणेबाबत कोणताही उल्लेख केल्याचे दिसून आलेले नाही.

3) सन 2015-2016 मधील आदिवासी उपयोजनेची (लेखाशिर्ष 2236 1417) लेखापरीक्षणासाठी उपलब्ध माहितीनुसार विभागाकडील उपलब्ध तपशिलानुसार सन 2015-2016 च्या निधी खर्चा बाबत विभागाने नियोजन केले असते, तर सदरची रद्द केलेल्या कामांची रक्कम रूपये 1,95,36,000/- शासनास परत करण्याची गरज पडली नसती. सदर रक्कम अखर्चित राहण्याची कारणे तसेच शासनाने पुरेशी तरतूद करून देखील विभागाने खर्च केला नाही. तरी प्रकरणी संबंधिताची जबाबदारी निश्चित होणे आवशक आहे. तसेच सदर रक्कम रूपये 1,95,36,000/- शासनास भरणा केलेबाबत अभिलेखे, चलनाची प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. तरी अखर्चित रक्कम शासन सदरी भरणा करून अनुपालन सादर करावे.

4) सन 2015-2016 साठीचे वरील 37 अंगणवाडी बांधकाम प्रस्तावास उपरोक्त नमूद प्रशासकीय मान्यता दिनांक 28/10/2015 व दिनांक 31/10/2015 अन्वये देण्यात आली असतांना देखील सदर कामांची बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, नाशिक यांचे मार्फत ई- निविदा प्रक्रिया दिनांक 31/03/2016 अखेर पूर्ण करण्यात आली नसल्याचे नास्तीवरून दिसून येते. त्यामुळे सन 2015-2016 मध्ये अंगणवाडी बांधकामावर खर्च झाला नसून सदर कामे रद्द केल्याचे नस्तीवरून दिसून येते. सदर बाबतीत उचित कार्यवाहीसह अनुपालन सादर करावे.

5) वरील तपशिलानुसार 43 पूर्ण झालेल्या कामांवर रक्कम रूपये 1,73,98,319/- खर्च झाल्याचे दिसते. सदर पूर्ण कामांचे तपशील, अंगणवाडी यादी, कामाचे मुल्यांकन, पूर्णत्वाचा दाखले इत्यादी माहिती लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झाली नाही. त्यामुळे खात्री करता आली नाही.

**3.923 अंगणवाडी बांधकामाबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** एकात्मिक बालविकास व सेवा योजना अंगणवाडी इमारत बांधकाम सन 2015-2016 नस्तीचे लेखापरीक्षण केले असता जिल्हा परिषदेस जिल्हा नियोजन समितीकडून रूपये 17,78,00,000/- अनुदान प्राप्त झाले असून लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 8, दिनांक 20/10/2016 रोजी खुलासा मागविला होता. तथापि, संबंधीत संस्थेचे त्याबाबत कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अंगणवाडी बांधकामासाठी प्राप्त शासन अनुदानाची रक्कम वित्तप्रेषणाने बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आलेली असून सन 2015-2016 मध्ये रक्कम रुपये 15,37,25,087/- खर्च करण्यात आलेली असून रूपये 4,22,99,623/- अखर्चित रक्कम शिल्लक असल्याचे दिसून येते.

महिला बालकल्याण विभाग व बांधकाम विभाग यांनी समन्वयाने एकत्रित योग्य नियोजन न केल्याने अंगणवाडी बांधकाम पूर्ण झाल्याचे दिसून येत नाही.

2) सन 2014-2015 मधील एकूण 271 अंगणवाड्यांपैकी सन 2014-2015 अखेर अपुर्ण असलेल्या 55 अंगणवाड्यांबाबत आढावा घेतला असता मंजूरी आदेशाप्रमाणे अंगणवाडी इमारत बांधकाम सुरु करण्यात आले किंवा कसे? याबाबतची कागदपत्रे नस्तीसोबत उपलब्ध झालेली नाहीत. अनुदान मंजुर आदेशामध्ये नमूद केल्याप्रमाणे किती ग्रामपंचायतींकडे अंगणवाडी बांधकामासाठी स्वत:ची जागा आहे? जागा उपलब्ध झाली नसलेस काय कार्यवाही केली? याबाबतची माहिती उपलब्ध झाली नाही.

3) सन 2015-2016 मधील मंजुर अंगणवाडी इमारत पूर्ण झाल्याच्या नोंदी मालमत्ता नोंदवहीत घेतलेचे तसेच विनीयोग दाखले उपलब्ध केलेले नाहीत. तसेच जागा उपलब्ध नसलेमुळे दुबार अंगणवाडी आदेश प्राप्त झाले किंवा मंजुर रक्कमेपेक्षा कमी खर्च झाल्याकारणास्तव रक्कम अखर्चित शिल्लक शासनाकडे भरणा करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळून आलेले नाही.

4) खटाव तालुक्यातील पुसेसावळी संभाजीनगर मंजूरी आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी जावक क्रमांक साजिप/एबाविसेयो/का/1/1135/2014, दिनांक 29/12/14 ने मंजूरी घेतलेली असून आता अंगणवाडी बांधकामास मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या उपरोक्त आदेशाने त्याऐवजी खटाव तालुक्यातील पुसेसावळी 183 मंजूरी घेतल्याचे दिसून येते. सदरची मंजूरी उशीरा घेतल्याने अंगणवाडी बांधकाम वेळेत पूर्ण झाले नाही. त्यामुळे शासनाचा रक्कम रूपये 4,84,116/- नाहक गुंतून राहिल्याचे दिसून येते.

5) सन 2015-2016 मध्ये मंजूरी 308 अंगणवाड्यापैकी फक्त 10 अंगणवाड्या पूर्ण आहेत. म्हणजे मंजुरीच्या फक्त 0.032 टक्के अंगणवाड्या पूर्ण झाल्या आहेत. याबाबतची नोंदवही अद्यायावत करुन विलंबाबाबतच्या कारणांच्या तपशिलासह नोंदी करणे आवश्यक आहे. तसेच इमारती प्रशासकीय मान्यता मार्गदर्शक सूचनेनुसार पूर्ण झाल्याची खात्री करणे आवश्यक आहे. तसेच पूर्ण झालेल्या इमारती या ग्रामपंचायतीकडे वर्ग केलेची व वापरात असल्याची कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध करुन पुर्तता दाखवावी.

6) शासनाकडून योजनेसाठी प्राप्त झालेला निधी व मार्गदर्शक तत्वे कटाक्षाने पालन करुन संबंधीत निधी व अनुदान हे ज्या त्या वित्तीय वर्षात खर्च करुन कामे पूर्ण करणे आवश्यक असतांनाही तशी कार्यवाही केली जात नाही. त्यामुळे इमारती अभावी खाजगी / भाड्याने / सार्वजनिक ठिकाणी अंगणवाड्या चालवाव्या लागत आहेत. त्यासाठी वित्तीय वर्षात भाडयापोटी रूपये 3,40,800/- खर्च करण्यात आला आहे. त्यामध्ये बचत झाली असती. त्यासाठी योग्य नियोजन व प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

**3.924 अंगणवाडी बांधकाम अनुदान व खर्चामधील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** एकात्मिक बालविकास सेवा योजना, जिल्हा कक्ष, जिल्हा परिषद, कोल्हापूर सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात अर्थसंकल्पिय वार्षिक लेख्यांची पडताळणी केली असता अंगणवाडी बांधकामासाठी 22361168 लेखाशिर्षांतर्गत प्राप्त अनुदान व खर्चावर खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2015-2016 करीता 156 अंगणवाडी बांधकामाचे उद्दीष्ट ठेवण्यांत आले होते पैकी 61 अंगणवाड्यांचे बांधकाम माहे मार्च 2016 अखेर पूरण करणेत आले असून 95 अंगणवाड्यांची बांधकामे प्रगतीप्रथावर असल्याचे विभागाकडून प्राप्त नस्तीवरुन दिसते. सन 2014-2015 मध्ये जिल्हा वार्षिक योजनेतून प्राप्त अनुदानातून रक्कम रुपये 1,32,480/- अखर्चित होती. तसेच सन 2015-2016 करीता रक्कम रुपये 8,55,00,000/- इतका निधी प्राप्त झाला असून विभागाकडे रक्कम रुपये 8,56,32,480/- इतका निधी खर्चाकरीता उपलब्ध होता. तथापि विभागाने त्यापैकी रक्कम रुपये 5,95,05,821/- इतका निधी प्रत्यक्ष खर्च केला आहे. सदर विवरण पहाता सन 2014-2015 मधील प्रगतीपथावरील कामे निरंक असून सन 2015-2016 करीता एकुण प्रत्यक्ष प्राप्त निधीपैकी रक्कम रुपये 2,61,26,659/- इतका निधी अखर्चित राहिलेला आहे. अखर्चित निधी शासन खाती भरणा केलेला नाही. त्याचप्रमाणे सदर निधीतून सन 2015-2016 मध्ये झालेला खर्च, केलेल्या कामांची यादी, अपूर्ण कामांची यादी, जिल्हा वार्षिक नियोजन समितीस पाठविलेला वार्षिक अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.

2) खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्र उपलब्ध झाली नाहीत.

3) वरीलप्रमाणे अपूर्ण कामामध्ये शासनाचा निधी गुंतून राहिलेला असल्यामुळे संबंधीत मंजूर कामापैकी प्रगतीपथावर असलेली अंगणवाडयांची बांधकामे विहित वेळेत बांधकाम विभागाकडे पाठपुरावा करुन पुर्ण होणेच्या दृष्टीने विभागाकडून कार्यवाही होणे आवश्यक आहे. तथापि त्याप्रमाणे विभागाकडून कार्यवाही झालेली नाही.

4) अपूर्ण कामे किंवा कामामध्ये होणाऱ्या दिरंगाईमध्ये कंत्राटदाराने निविदा प्रक्रियेनुसार कामकाज केलेले नसेल तर अशा कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करणे, कामाची निविदा रदद करणे, फेर निविदा काढणे याप्रमाणे

कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. त्यामूळे एकंदरच अपूर्ण कामे पुर्ण करणेबाबत गांभीर्याने लक्ष देण्यात आलेले नाही. सदर अनियमितता बाबत बांधकाम विभागाशी पाठपुरावा करुन कार्यवाही करुन अनुपालन दर्शवावे.

5) सन 2015-16 मध्ये जिल्हा वार्षिक योजने मधुन ज्या अंगणवाड्यांची बांधकामे पुर्ण झालेली आहेत. अशा कामांची ताबापट्टी संबंधीत ग्रामपंचायती / अंगणवाडीकडे दिल्याचे लेखे पडताळणीस उपलब्ध झालेले नाहीत. जी कामे पुर्ण झालेली आहेत त्यांचे अंदाजपत्रक, मुल्यांकन, काम पुर्णत्वाचा दाखला इत्यादी लेखे विभागाने बांधकाम विभागाकडून उपलब्ध करुन घेऊन दप्तरी ठेवणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

6) सन 2014-15 अखेर जिल्हा वार्षिक योजनेतून रक्कम रुपये 1,32,480/- माहे मार्च 2015 अखेर अखर्चित होती. या रक्कमेपैकी सन 2015-16 अखेर किती रक्कम खर्च झाली या बाबत बांधकाम विभागाकडील खर्चाशी मेळ घेऊन निधी शिल्लक रहात असल्यास सदर निधी शासन निर्णयानुसार पुढील वित्तीय वर्षाखेरीसही अखर्चित राहील्याने शासन खाती भरणा करणेबाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**3.925 सन 2011-2012 मधील अंगणवाडी बांधकाम निधी सन 2015-2016 मध्ये खर्च केलेबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये सन 2011-2012 मधील मंजूर अंगणवाड्यांची रक्कम रुपये 8,05,171/- देयके अदा केलेली आहेत. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/1002/प्र.क्र.128/अर्थोपाय, दिनांक 06/06/2008 अन्वये एका आर्थिक वर्षात मुक्त झालेला निधी त्या लगतच्या पुढील आर्थिक वर्षात खर्च करणेची मुभा राहील. तथापि, विभागाने सन 2011-2012 मधील मंजूर अंगणवाडी बांधकाम निधी सन 2015-2016 मध्ये खर्च केलेला आहे. सदर खर्चास सक्षम प्राधिकारी यांची मंजूरी घेतलेली लेखापरीक्षणास सादर करावी.

**3.926 सन 2015-2016 जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सर्वसाधारण योजनेमधुन अंगणवाडी इमारत बांधकामाबाबत**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** सदरबाबत रक्कम रुपये 63,00,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) जिल्हा परिषद स्थायी समिती सभा ठराव क्रमांक 6, दिनांक 06/08/2015 नुसार ज्या ग्रामपंचायती सदर चे अंगणवाडी बांधकाम करण्यास तयार आहे, ते कामे ग्राम पंचायत स्तरावर देण्यांत येवून उर्वरीत कामे जिल्हा परिषद स्तरारुन बांधकाम विभागामार्फत करण्याबाबत मान्यता दिली आहे. परंतु, पंचायत समिती स्तरावरुन ग्रामपंचायतीकडुन बांधकाम करण्याबाबतचे प्रस्ताव न घेता तथा अनुदान ग्राम पंचायतीला देणे आवश्यक असतांना आलेला सर्व निधी कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद बांधकाम यांच्याकडे वळती करण्यांत आलेला आहे. निधी वळती करण्याबाबचे शासनाचे क्षमापन आदेश प्राप्त करुन दर्शवावे.

2) कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद बांधकाम अमरावती यांचे पत्र क्रमांक बांध/तां-3/7615/16, दिनांक 01/07/2016 पर्यंत जागा उपलब्ध झाली नसल्याचे दिसुन येते. जागा उपलब्ध नसतांना निवड यादीमध्ये वलगाव यांची निवड कशी केली? म्हणजेच प्रस्ताव न येता निवड यादी तयार करण्यांत आलेली आहे.

3) धारणी, चिखलदरा वगळून इतर 12 प्रकल्पामध्ये एकूण 116 ग्रामपंचायतींची नांवे सभेने मंजुर केलेले आहे. त्यामध्ये अचलपुर तालुक्यातील वडगाव मंजूर आहे. परंतु, जागा नसल्याने वडगाव ऐवजी जवर्डी केंद्र क्रमांक 23 व चांदुर रेल्वे तालुक्यातील मांजरखेड दानापूर मंजुर परंतु, बांधकाम अगोदरच झाले असल्याने मांजरखेड दानापूर ऐवजी आमला केंद्र क्रमांक 9 ला उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) जिल्हा परिषद अमरावती यांचे पत्र क्रमांक 2230, दिनांक 04/12/2015 व पत्र क्रमांक 2331, दिनांक 18/12/2015 अन्वये वरिल बदलास मंजुरी प्रदान करण्यांत आलेली आहे. वरील करण्यात आलेल्या बदलास सर्वसाधारण सभेची मंजुरी घेणे आवश्यक असतांना सर्वसाधारण सभेची मंजुरी घेण्यांत आलेली नाही.

4) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) जिल्हा परिषद अमरावती यांचे पत्र क्रमांक 2162, दिनांक 25/08/2016 नुसार सरपंच / सचिव ग्रामपंचायत यावली शहिद पंचायत समिती अमरावती यांना अंगणवाडी केंद्र

क्रमांक 154 मंजुर करण्यांत आले होते. बांधकामाचे ई-टेंडर करण्यांत येवून श्री.वैभव खेतकडे या ठेकेदारास कार्यारंभ आदेश देण्यात आला असल्याचे नमुद आहे. परंतु, जागा उपलब्ध नसल्याने करारनामाची मुदत संपल्यामुळे ठेकेदाराने अनामत रक्कम परत मिळण्याकरिता अर्ज सादर केलेला आहे. जागा उपलब्ध नसतांना ठेकेदारासोबत करारनामा कसा तयार करण्यात आला. तसेच गावाची निवड कशी करण्यांत आली ? सर्व निधी 31/03/2016 पर्यंत खर्च करावयाचा असल्यामुळे केवळ प्रकिया पूर्ण करण्याचे दर्शविण्याकरिता सर्व प्रक्रिया केल्याचा आभास निर्माण केलेला आहे. खुलासा करावा.

5) कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग अमरावती यांचेकडुन 2015-2016 मधिल वार्षिक योजने अंतर्गत प्रस्तावित असलेले 116 बांधकामाबाबत व 2015-2016 मध्ये आदिवासी उपयोजने अंतर्गत धारणी व चिखलदरा मधिल 30 अंगणवाडी बांधकामाबाबत दिनांक 31/03/2016 अखेरचा आर्थिक व भौतिक अहवाल प्राप्त झालेला नाही.

6) आलेला निधी केवळ बांधकाम विभागास हस्तांतरीत केला. परंतु, कोणतेही अभिलेखे महिला व बालकल्याण विभाग जिल्हा परिषद अमरावती यांनी आपल्या स्तरावर ठेवलेले नाही.

7) मार्च अखेर सदर बांधकामावर किती खर्च झाला, कोणते कामे पूर्ण / अपूर्ण, कोणते सुरु नाही, किती प्रगतीत आहे, याचा तपशिल लेखापरिक्षणास सादर केलेला नाही. तथा बांधकाम विभागाकडुन महिला व बालकल्याण विभागाने घेण्यांत आलेला नाही.

8) 116 बांधकामे मंजुर यादीवर मुख्य कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

9) अंगणवाडी बाधाकामाकरिता ग्रामपंचायती जवळ जागा उपलब्ध असल्याचे व नमुना 8 अ नस्तीत आढळून आलेला नाही.

10) बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र नाही. उपयोगीता प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.

11) ग्रामपंचायतीच्या ठरावाच्या प्रती, देखभाल व दुरुस्ती प्रमाणपत्रे उपलब्ध नाही. ग्रामपंचायतीला अंगणवाडी नसल्याबाबत गटविकास अधिकारीकडून शिफारस पत्र, पाहणी /तपासणी अहवाल घण्यात आलेले नाही.

**3.927 अंगणवाडी / बालवाडी सेविका / मदननिस व पर्यवेक्षिका यांचे प्रशिक्षण योजना खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** याबाबत रक्कम रूपये 15,00,000 /- खर्च करण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर प्रशिक्षण हे प्रकल्प स्तरावर एकात्मीक बालविकास सेवा योजना कार्यालय यांनी राबवायचे असतांना निविदेनुसार सेवाभावी संस्थेला देण्याचे प्रयोजन काय?

2) शर्ती व अटी प्रमाणे सदर प्रशिक्षण राबवितांना प्रशिक्षणार्थीच्या संख्येनुसार कमीत कमी तीन दिवस ते पाच दिवस प्रशिक्षण कार्यक्रम नियोजनबध्दरित्या प्रकल्प स्तरावर आयोजीत करणेबाबत सुचना असतांना प्रशिक्षण दोन दिवसात कसे पुर्ण करण्यात आले?

3) प्रकल्प स्तरावर सदर प्रशिक्षण यशस्वी झाल्याबाबत खर्च अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र विभागस्तरावर नस्तीला पाहावयास मिळाले नाहीत.

**3.928 किशोर वयीन मुलींना व महिलांना जेंडर, कु टुंब नियोजन, कायदे विषयक प्रशिक्षण** खर्चाबाबत

**जिल्हा परिषद अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** याबाबत रक्कम रूपये 15,00,000 /- खर्च करण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रशिक्षणाकरीता 10 टक्के लाभार्थी हिस्सा घेण्यात यावा, असे नमुद असतांना प्रकल्प स्तरावर 10 टक्के लाभार्थी हिस्सा घेतला किंवा कसे, याबाबत नस्तीला माहिती नमुद नाही.

2) प्रशिक्षणाकरीता 3 टक्के अपंगाकरीता राखीव जागा ठेवण्यात याव्यात. तशा प्रकारची कार्यवाही केल्याचे आढळत नाही.

3) सदर प्रशिक्षण हे प्रकल्प स्तरावर एकात्मिक बालविकास सेवायोजना कार्यालय यांनी राबवायचे असतांना निविदानुसार सेवाभावी संस्थेला देण्याचे प्रयोजन काय?

4) शर्ती व अटी प्रमाणे सदर प्रशिक्षण राबवितांना प्रशिक्षणार्थीच्या संख्योनुसार कमीत कमी तीन दिवस ते पाच दिवस प्रशिक्षण कार्यक्रम नियोजनबध्दरीत्या प्रकल्प स्तरावर आयोजीत करणेबाबत सुचना असतांना प्रशिक्षण दोन दिवसात कसे पुर्ण करण्यात आले?

5) प्रकल्प स्तरावर सदर प्रशिक्षण यशस्वी झाल्याबाबत खर्च अहवाल व उपयोगीता प्रमाणपत्र विभागस्तरावर नस्तीला पाहावयास मिळाले नाहीत.

**3.929 अंगणवाडी केंद्रांना मॅट (चटई) पुरविणे खर्चातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत रक्कम रूपये 1,99,909/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मागणी नसतांना मॅट (चटई) कोणत्या आधारावर खरेदी करण्यात आली. याबाबत लेखापरिक्षणात अभिलेखे सादर नाहीत. उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तालुका स्तरावरील सर्व एकात्मीक प्रकल्प अधिकारी यांना चटई बाबत मागणी सादर करणेबाबत कळविणेबाबत आवश्यक असतांना तशी कार्यवाही करणेत आल्याचे दिसुन येत नाही. तसेच कोणत्याही प्रकल्पांनी मागणी कळविलेली दिसुन येत नाही. त्यामुळे मागणी नसतांना चटई खरेदी केल्याचे दिसुन येते.

2) साहित्य् पुरवठयाबाबत वापरण्यात आलेल्या डिलिव्हरी चलान हया छापील तीन प्रतीत विविध रंगाच्या असणे आवश्यक असतांना संगणकीय टंकलिखीत केलेल्या आढळुन आल्या. त्यावर साहित्य् पुरवठा करणा-या वाहनाचा ट्रक क्रमांक नमुद केलेला आढळुन आला नाही. तसेच माल सुस्थितीत प्राप्त् झालेबाबत डिलिव्हरी चलानावर तालुका अधिका-यांचा शेरा आढळुन आला नाही. यावरुन मालाचा प्रत्यक्षात पुरवठा केलेबाबत खात्री होवु शकली नाही.

3) दर करारातील अट क्रमांक 6 नुसार 90 टक्के प्रदान माल प्राप्त् झालेपासुन दोन आठवडयांचे आत करणे आवश्य्क असतांना तशी कार्यवाही केलेली दिसुन येत नाही. तसेच उर्वरित 10 टक्के प्रदान माल सुस्थितीत प्राप्त् झाल्याचे समाधानकारक प्रमाणपत्र सादर केल्यानंतर 30 दिवसांचे आत करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली दिसुन येत नाही. तसेच उर्वरित 10 टक्के प्रदान लेखापरिक्षणापावेतो केल्याचे दिसुन येत नाही.

4) तालुका प्रकल्पांकरिता अंगणवाडयांना डिलीव्हरी चलनाव्दारे चटई पुरविण्यात आल्या. त्यावर पोहोच झाल्याची सही नमुद असुन प्राप्त् झाल्याबाबत शेरा नाही. तसेच काही डिलीव्हरी चलनावर दिनांकित सही केलेली नाही. त्यामुळे माल वेळेत प्राप्त् झालेबाबत खात्री करता आली नाही.

5) सादर डिलीव्हरी चलनानुसार तालुका प्रकल्प् मालेगाव, वाशिम, मानोरा येथिल सादर चलना नुसार प्राप्त् कर्त्याची माल प्राप्त् झालेबाबत दिनांक 03/08/2015 रोजी सही केलेली आहे. म्हणजेच पूरवठादाराने 30 दिवसांचे आत पुरवठा करणे आवश्यक असतांना एकुण 11 दिवस उशिराने पुरवठा करणेत आला आहे. त्यामुळे पुरवठा आदेशातील अट क्रमांक 13 नुसार 5 टक्के दंड आकारुन रुपये 9,995/- वुसल करुन अनुपालन दर्शविणेत यावे.

6) प्रकल्पाअंतर्गत अंगणवाडीत वितरीत केलेल्या चटई करिता विहित नमुन्यातील चटई वाटप नोंदवही ठेवणेत आलेली नाही. त्यामुळे केलेले वाटपाबाबत खात्री करता आली नाही. रिसो्ड प्रकल्प अंतर्गत अंगणवाडयाकरिता चलन क्रमांक 489 दिनांक 24/06/2015 व्दारे एकुण 23 चटई प्राप्त् असतांना व मागील वर्षाची चटई शिल्ल्क नसतांना 27 चटई कसे वाटप करणेत आले याबाबत खुलासा करावा.

**3.930 विशेष घटक योजने अंतर्गत अगंणवाडी केद्रांना मॅट (चटई) पुरविणे खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदर बाबत रक्कम रूपये 5,25,962/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए2013/प्र.क्र.76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 मधील मुददा क्रमांक 13 अन्वये बालकांच्या सर्वागीण विकासासाठी, बौध्दीक, शारिरिक, शैक्षणिक

विकासाठी साहित्य खरेदी करण्याबाबत नमुद आहे. परंतु, विभागाने सन 2014-2015 व 2015-2016 मध्ये मॅट खरेदी केली व इतर योजनमधुन सुध्दा मॅट खरेदी केली. यावरुन एकच एकच साहित्य खरेदी केल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे बालकांच्या सर्वागीण बौद्धिक, शारिरिक, शैक्षणिक विकासाची विचार करुन साहित्य खरेदी करण्यात येत नसल्याचे निदर्शनास येते.

2) उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, वाशिम, यांनी एकात्मीक प्रकल्प अधिकारी, तालुका व कोणत्याही प्रकल्पांनी मागणी कळविण्यात आली नाही. त्यामुळे मागणी नसंतांना मॅट (चटई) कोणत्या आधारावर खरेदी करण्यात आली व प्रकल्पांना वाटप करण्यात आली? याबाबत पडताळणी करता आली नाही.

3) कारंजा, मंगरुळ, रिसोउ यांचे डिलेव्हरी चलानवर माल कोणत्या दिनांकाला प्राप्त झाली? याबाबत दिनांक नमुद नाही. करीता पुरवठा कधी प्राप्त झाला? याबाबत पडताळणी करता आली नाही

4) साहित्य पुरवठयाबाबत वापरण्यात आलेल्या डिलेव्हरी चलान हया छापील तीन प्रतीत विविध रंगाच्या असणे आवश्यक असतांना टंकलिखित केलेल्या आढळुन आल्या. त्यावर साहित्य पुरवठा करणा-या वाहनाचा ट्रक चा क्रमांक असणे आवश्यक असतांना आढळुन आला नाही. यावरुन कोणतया वाहनानी मालपुरवठा केला. याबाबत शहनिशा करता आली नाही.

5) सन 2014-2015 मधील 51 चटईचा साठा अवितरीत असतांना निरंक दाखविण्यात आला. सदर साठा कुणाला वितरीत केला? त्याबाबत खुलासा करण्यात यावा.

6) तालुक्याने व केद्रांनी विशेष घटक योजनेअंतर्गत व उपकरा अंतर्गत मिळालेल्या मॅटचा हिशेब एकत्रित ठेवल्यामुळे कोणत्या योजनेतुन किती वितरण करण्यात आले? याबाबत खात्री करता आली नाही. त्याचप्रमाणे सन 2014-2015 व 2015-2016 मध्ये तालुका स्तरावर अंगणवाडी संख्येनुसार वितरण न करता कमी जादा वितरण करण्यात आले.

**3.931 जादा दराने स्टेशनरी खरेदी करणेबाबत व साठा नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध न करणेबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 330, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 93,893/- खर्च करण्यात आला आहे.

1) एकात्मीक बालविकास विभाग, जिल्हा परिषद बुलडाणा येथील सन 2015-2016 चे लेखापरिक्षणाचे वेळी खालीलप्रमाणे विभागाने स्टेशनरी खरेदी केलेली आहे. विभागीय भांडार यांचेकडे सदर साहित्य नसल्यामुळे त्यांनी खुल्या बाजारातुन खरेदी केली आहे. सदर कालावधीत आरोग्य विभागा अतंर्गत अध्यक्ष, सचिव कल्याणी सुशिक्षीत सेवा सहाकारी संस्था, बुलडाणा यांचे सोबत सन 2015-2016 या वित्तीय वर्षासाठी कार्यालयीन स्टेशनरी खरेदी करीता दर निश्चिती केली आहे. त्याच दर निश्चितीनुसार खरेदी करणे अपेक्षीत होते. परंतु दर करारानुसार खरेदी न करता सर्वज्ञ प्रिंटर्स अँड जनरल सप्लायर्स यांचेकडून जादा दराने स्टेश्नरी खरेदी केलेमुळे रुपये 14,675/- जादा खर्च झाला तो वसूल करावा.

2) लेखापरिक्षणातील अर्ध समास पत्र क्रमांक 01, दिनांक 24/05/2017 अन्वये एकात्मीक बालविकास विभागाला साठा नोंदवहीची मागणी केली असता त्यांनी उपरोक्त साहित्याचे साठा नोंदवही लेखापरिक्षणास सादर केली नाही. त्यामूळे संबंधीताने खरेदी केलेली स्टेश्नरी साठा पूस्तकामध्ये नोंदविण्याबाबत कोणतेच पूरावे सादर केले नाही. तसेच सदर साहित्याचा वापर कोणी केला याबाबत नोंदी सादर केल्या नाहीत, यावरुन केवळ स्टेशनरी खरेदी केल्याचा भास निर्माण केल्याचे दिसून येत आहे. सदर प्रकरणी पूरावे दाखल करावे अथवा रक्कम रुपये 93,893/- शासन खाती भरणा करून अनुपालन लेखापरिक्षणास सादर करावे.

**3.932 अंगणवाडी केंद्रांसाठी स्टिल कपाट व इलेक्ट्रानिक्स वजन काटे पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1 व 2) -** सदर योजनांतर्गत रक्कम रूपये 23,32,683/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश क्रमांक 468 दिनांक 31/03/2015 व आदेश क्रमांक 970 दिनांक 04/09/2014 मधील अटी व शर्ती नुसार सदर साहित्याचा पुरवठा 90 व 30 दिवसाच्या आत दिनांक 29/06/2015 व दिनांक 04/10/2014 पर्यंत प्रकल्प कार्यालयास पुरवठा करावयाचा असतांना प्रत्यक्षात दिनांक 01/09/2015 व दिनांक 15/01/2015 पर्यंत पुरवठा केल्याने सदर आदेशातील अट क्रमांक 9 व 8 नुसार पुरवठादाराकडुन दंडाची रक्कम रूपये 62,775 + 60,795 = 1,23,570/- वसुल करणे आवश्यक असताना रक्कम रूपये 15,144/- वसुल करण्यात आलेली आहे. तरी उर्वरीत रक्कम रूपये 1,08,426/- वसुल करण्यात यावे.

2) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पुरवठा आदेश 468 दिनांक 31/03/2015 व 249 दिनांक 25/02/2015 मधील अट क्रमांक 12 नुसार 3 टक्के सुरक्षा ठेवीची रक्कम देयकातुन कपात करून ठेवुन साहित्याचा पुरवठा झाल्याचे दिनांकापासुन एक वर्षापर्यंत कोणतीही तांत्रिक तक्रार न झाल्याने परत करावयाचे असताना अशाप्रकारे 3 टक्के रक्कम कपात न करता संपुर्ण रकमेचे नियमबाहयपणे प्रदान करण्यात आलेले आहे.

3) प्रकल्प स्तरावरील साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने प्रकल्प स्तरावर साहित्य प्राप्त झाल्याचे तपासता आले नाही.

4) सेफेक्स कुरीअर यांचे डिलिवरी रिसिप्ट नंबर 0019920583 नुसार सदर साहित्य नागपुरला दिनांक 12/01/2015 ला प्राप्त झालेले आहेत. 12 प्रकल्पांना त्यानंतर दिनांक 15/01/2015 पर्यंत प्रत्यक्ष पुरवठा केलेला आहे. मात्र प्रकल्प कार्यालय हिंगणा यांना दिनांक 09/01/2015 ला सदर साहित्य प्राप्त झाल्याबाबत लेखापरीक्षणास दिसुन आलेले आहे.

**3.933 नक्षलग्रस्त भगातील आंगणवाडी केंद्रातील बालकासाठी खेळणी खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 1689, दिनांक 08/03/2016 अन्वये रक्कम रूपये 4,15,480/- खर्च करण्यात आले आहे. ई-निवीदा करून कमी निविदाधारकाला साहित्याचा पुरवठा आदेश देवून केलेल्या पुरवठयाबाबत रक्कमेचे प्रदान करून खर्च रोखपुस्तकात खर्ची घालण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रशासकिय मंजुरी आदेश क्रमांक 249 नुसार निधी सन 2014-2015 या वित्तींय वर्षात खर्च करावयाचा असतांना तो सन 2015-16 मध्ये खर्च करन्याबाबत कारणींमिमंसा व्हावी.

2) प्रशासकिय मंजूरी नुसार अनुदान रूपये 5,50,000/- प्राप्त झाले असून खेळणी खरेदी रूपये 4,15,480/- झाली असून किरकोळ खर्च रूपये 3,292/- करन्यात आला असून रूपये 1,31,228/- पंचायत समिती लाखांदुर व साकोली ला वर्ग करन्यात आले आहे. निधी वितरन आदेश क्रमांक जिविस/भ./नक्षल/जिनिआ/का-6/373/ दिनांक 24/03/2015 मधिल बाब क्रमांक 4 नुसार जिल्हा समन्वय समितीने ज्या कामासाठी निधी खर्च करावयाला मान्यता दिली आहे त्याच कामावर निधीखर्च करने आवश्यक असतांना निधी रोख वितरन पंचायत समिती लाखंदूर व साकोली ला वितरन केल्याने नियम बाह्यता झाली आहे.

3) पुरवठा आदेश दिनांक 02/01/2016 ला दिलेला असून स्टॅपपेपरवर करारनामा दिनांक 07/01/2016 ला करण्यात आला आहे. पूरवठा आदेश दिल्यानंतर करारनामा केल्याने नियमबाह्यता झाली आहे.

**3.934 अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा कमी / अधिक खर्च करणेबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** सन 2015-16 करीता विभागास प्राप्त झालेल्या अंतीम अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा कमी / अधिक खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्राप्त अनुदानाच्या मर्यादेत खर्च करणे आवश्यक असतांना वरीलप्रमाणे लेखाशिर्षनिहाय रुपये 3,36,07,186/- कमी खर्च केल्याचे दिसून आले. याबाबत कोणताही उल्लेख विभागाने केलेला नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1091/15701/प्र.क्र.1285/23, दिनांक 09/09/1991 व वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक 08/06/2008 नुसार अखर्चीत निधीबाबत कार्यवाही करावयाची असतांना तशी कार्यवाही दिसून आली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 58(3) नुसार केलेल्या खर्चाचा ताळमेळ वित्त विभागाशी करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

**3.935 भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजनेतील अनियमिततााबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत एकात्मिक बालविकास सेवा योजना सन 2015-16 चे लेखापरीक्षणात भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजनेची नस्तीची तपासणी केली असता विभागाने सदर योजना सन 2015-16 मध्ये राबविल्याचे आढळून आले. सदर योजने अंतर्गत अनुसूचीत क्षेत्रातील गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांना एक चौरस आहार पुरविण्यासाठी बालविकास प्रकल्पांना अनुदान वाटप करण्यात येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक आविवि-2015/प्र.क्र.78/कार्यासन-8, दिनांक 18/11/2015 मधील नियम क्र.2.1 नुसार आंगणवाडी /मिनी आंगणवाडी क्षेत्रातील सर्व गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांची आंगणवाडी केंद्रात नोंदणी करुन लाभार्थी यादी तयार करण्यास सुचविले असतांना लाभार्थ्यांची यादी नस्तीला आढळून आली नाही. तसेच अर्धसमासपत्र क्रमांक 3, दिनांक 20/04/2017 अन्वये मागणी करुनही लेखापरीक्षणास सादर करण्यात आली नाही.

2) बालविकास प्रकल्पांनी आंगणवाडी सेविका व मदतनीस यांना दिलेल्या मानधनाच्या पोचपावत्या व उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त केले नसल्याचे दिसून आले.

3) योजनेच्या नस्तीतील पान क्रमांक 2 नुसार अमृत आहार योजनेंतर्गत एकात्मिक बालविकास प्रकल्प, सालेकसा, देवरी व अर्जुनी मोरगाव यांनी योजना आंगणवाडी मध्ये कार्यान्वीत झाल्याबाबत विस्तार अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) यांनी दिनांक 17/02/2016 रोजी शंका व्यक्त केल्याचे दिसून आले. योजनेची अंमलबजावणी प्रत्यक्षात झाली होती किंवा नाही. याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 03, दिनांक 20/04/2017 अन्वये पुरावे सादर करण्यास सुचविले असता कोणतेही पुरावे लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नाही.

**3.936 अंगणवाडी बांधकामाबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रूपये 11,60,00,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, निर्णय महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एबावि-2013/प्र.क्र. 158/का-6, दिनांक 29/01/2014 अन्वये नव्याने मंजुरी देण्यांत येणा-या अंगणवाडी बांधकामासाठी खर्चाची मर्यादा वाढविण्यांत येत असल्याचे स्पष्ट नमुद केले आहे. जिल्हा परिषद, जालना ने 257 अंगणवाडयांना या शासन निर्णयाअगोदरच प्रशासकीय मान्यता दिली होती. (दिनांक 06/01/2014) त्यामुळे सदरील प्रशासकीय मान्यता रदद करण्याचा प्रश्नच उदभवत नाही. शासन निर्णयाचा चुकीचा अर्थ काढून पुर्वी दिलेली प्रशासकीय मान्यता रदद करण्यांत आली व प्रति अंगणवाडी रुपये 01.50 लक्ष प्रमाणे 188 अंगणवाडयांचा खर्च रुपये 2,82,00,000/- चा अतिरिक्त बोझा शासनावर लादण्यांत आला आहे.

2) दिनांक 29/01/2014 च्या शासन निर्णयाप्रमाणे अंगणवाडी बांधकाम हे प्रि फॅब्रीकेटेड स्ट्रकचर टेक्नॉलॉजीचा वापर करणे आवश्यक आहे. परंतु, अशा प्रकारचे अंदाजपत्रक तयार केल्याचे लेखापरीक्षणात दिसून आलेले नाही. प्रि फॅब्रीकेटेड स्ट्रकचर टेक्नॉलाजीचा वापर न करताच केलेल्या कामासाठी रुपये 04.50 लक्ष प्रति अंगणवाडीप्रमाणे अदा करणे आवश्यक आहे.

3) सदरील शासन निर्णयाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार बांधकामाची किंमत रुपये 06.00 लक्ष होत असल्याने ई-निविदेद्वारे काम करणे आवश्यक होते. परंतु, अशा प्रकारची कार्यवाही झाली किंवा कसे? याबाबत अभिलेख्याधारे खात्री पटवावी.

4) प्रशासकीय मान्यतेतील अट क्रमांक 09 अन्वये अंगणवाडी बांधकाम दिनांक 31/03/2015 अखेर पुर्ण करणे आवश्यक आहे. परंतु, सन 2015-2016 च्या लेखापरीक्षणात सादर केलेल्या विवरणपत्रानुसार केवळ 59

अंगणवाडया पुर्ण केल्याचे दिसून येते. म्हणजेच दिनांक 31/03/2016 पर्यंतही अंगणवाडया पुर्ण करण्यांत आलेल्या नाहीत. सन 2013-2014 ते 2015-2016 पर्यंत दोन वर्षाचा कालावधी उलटूनही सदरील वास्तूचा लाभ गावांतील लहान मुलांना मिळालेला नाही व शासनाचा उददेश सफल झालेला नाही.

5) विभागाने सादर केलेल्या विवरणपत्रानुसार रुपये 6.00 लक्ष प्रमाणे 59 अंगणवाडया जर पुर्ण झाल्या असेल, तर रुपये 354.00 लक्ष खर्च होणे अपेक्षीत आहे. परंतु, विवरणपत्र रुपये 118.00 लक्ष खर्च झाल्याचे दिसून येतो. यावरुन 59 अंगणवाडया पुर्ण झाल्या किंवा कसे, याबाबत शंका निर्माण होते.

6) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-1002/प्र.क्र.128/अखर्चित, दिनांक 06/06/2008 नुसार अखर्चित रक्कमा पुढील वर्षात खर्च करता येतात. विभागाला सन 2013-2014 मध्ये रुपये 1,160 लक्ष निधी प्राप्त झाला होता, जो सन 2014-2015 अखेर पर्यंत खर्च करणे अपेक्षीत होते. परंतु, विभागाने लेखापरीक्षण वर्षात सुध्दा रक्कम खर्च केली नाही. उपरोक्त शासन निर्णयानुसार सदरील रक्कम शासनास सुध्दा जमा केलेली नाही.

**3.937 अंगणवाडीसाठी प्रकल्पस्तरावर ग्रीन बोर्ड खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** अंगणवाडी केंद्र प्रकल्प स्तरावर दरकरारादवारे एकून नग 727 प्रमाणक क्रमांक 906, दिनांक 31/3/2016 अन्वये रक्कम रुपये 27,99,757/- एवढा खर्च करून प्रकल्प स्तरावर वाटप करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्र क्रमांक झेडपीए/2006/प्र.क्र.366/ वित्त-9, दिनांक 31/12/2009 मधील कोष्टकातील अ.क्र.2 नुसार जाहीरातीतील साहित्याचे मुल्य 5 लाखावर असल्याने विभागीय स्तरावरील एक ब वर्ग दैनिक मराठी/हिन्दी व ब वर्ग मराठी साप्ताहीक या वृत्तपत्रात जाहीरात देणे आवश्यक होते.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 83 (3) प्रमाणे पुरवठा साहित्याचा दर्जा व गुणवत्ता विभागाध्यक्ष तपासुन प्रमाणपत्र नोंदविणे आवश्यक आहे. तसे प्रमाणपत्र नोंदविलेले नसताना देयके पारीत केलेली आहेत.

3) पुरवठादारास रक्कम प्रदान केलेबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 77 नुसार मुद्रांकित पोहोच पावती घेतलेली नाही.

4) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद लातूर यांचे पुरवठा आदेश क्र.133, दिनांक 27/03/2016 नुसार अट क्र. 2 प्रमाणे पुरवठा आदेशांतील ग्रीन बोर्ड ही वस्तू दिनांक 31/03/2016 पर्यंत आदेशात नमूद केलेल्या ठिकाणी पुरवठा करणे बंधनकारक असताना ठेकेदारांनी साहित्याचा पुरवठा अंगणवाडी केंद्र प्रकल्प मुरुड दिनांक 16/04/2016, निलंगा 1 दिनांक 18/04/2016, निलंगा दिनांक 21/04/2016, रेणापूर दिनांक 18/04/2016 रोजी साहित्याचा पुरवठा प्रकल्प स्तरावर केलेला आहे. मालाचा पुरवठा वेळेत न केल्यास दर करारातील अटी प्रमाणे विलंबाचा दंड विभागाने आकारलेला नाही. दरकराराप्रमाणे तीन आठवडे विलंबाकरीता 0.5 टक्के प्रमाणे रक्कम रुपये 41996/- संबंधीत पुरवठाधारकाकडुन दंडाची रक्कम वसुल करून अनुपालन दर्शवावे.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 37 (1) व (2) अन्वये लेखा शाखेने देयक पारीत करताना प्रथमत देयकाची अचुक तपासणी करुनच नंतर देयके पारीत करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही अनुसरली नाही. याबाबत पुर्तत दर्शवावी.

6) सदरील साहित्याची खरेदी एकात्मिक बालविकास विभागाने केलेली असल्यामुळे साहित्य प्राप्त झाल्याची नोंद महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समितीचे लेखा संहिता 1968 चे नियम 80 नुसार विभागाच्या साठा नोंद वहीत घेवुन साहित्य खरेदी निविदेतील अटी व शर्तीनुसार प्राप्त झाल्याची खात्री करुन नंतरचे साहित्याचे वाटप लाभार्थीना झाले पाहिजे. परंतु विभागाने अशी कार्यवाही न करता साहित्य पुरवठा पंचायत समिती स्तरावर केल्याचे आढळुन आले, सदर नियमबाह्यतेबाबत खुलासा व्हावा.

7) साठा नोंदवहीत नोंद घेतल्याचे साठा नोंदवही पृष्ठ क्रमांक देयकावर नमुद नसताना देयक पारित केलेली आहेत. याबाबत समर्थनिय स्पष्टीकरण दर्शवुन पुर्तता करावी व तसे अनुपालन सादर करावे.

13 प्रकल्प स्तरांना 727 ग्रीन बोर्ड नग पुरविन्यात आले असुन प्रत्यक्षात 624 नगाचे वाटप झालेले आहे. साठा नोंदवही वरून वाटपा विना 57 नग ग्रीन बोर्ड प्रकल्पस्तरावर शिल्लक असल्याचे दिसुन आले वाटप न झाल्याबाबत संयुक्तिक खुलासा व्हावा. तसेच प्रकल्प किल्लारी 46 ग्रीन बोर्ड नग पुरवठा करण्यात आले परंतु त्यांनी पुरवठा संख्या व विनियोग संख्या या बाबतची साठा नोंदवही लेखापरीक्षनास दर्शवली नाही. त्यामुळे योजनेचा हेतु सफ़ल झाल्याचे दिसुन येतो असे नाही. पुर्तता दर्शववी.

8) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पुरवठा आदेश क्रमांक 133/16, दिनांक 28/03/2016 अट क्र.7 प्रमाणे आय.टी.आय. अथवा शासकीय तंत्रनिकेतन यांचा चाचणी अहवाल जोडणे आवश्यक आहे. तथापि संचिकेत मूळ चाचणी अहवाल नाही. त्यामुळे मालाचा दर्जा योग्य होता याची खात्री करता आली नाही.

9) तालुकास्तरावर करिता म्हणून साहित्य प्राप्तीच्या स्वाक्षरी कोणत्या प्राधिकाराने केल्या याचा खुलासा करावा त्यामुळे साहित्य प्राप्त झाल्याची खात्री होत नाही.